**<u>ठळक बातम्या</u>**

- सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर मिळावं यासाठी ३० हजार कोटी रुपयांच्या निधीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, आसाम आणि त्रिपुरासाठी सव्वा ४ हजार कोटी रुपयांचं विशेष पॅकेज

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची रशियाच्या अध्यक्षांशी दूरध्नीवरुन चर्चा, युक्रेन संघर्षावर शांतीपूर्ण मार्गानं तोडगा काढण्याची भारताची भूमिका कायम असल्याची मोदी यांची स्पष्टोक्ती

- बिहारमधल्या मतदारयाद्यांच्या प्रश्नावरुन संसदेत आजही गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७६५ अंकांची घसरण

<><><><><><>

केंद्र सरकारनं सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर मिळावं यासाठी ३० हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पेट्रोलियम कंपन्यांना नुकसानीची भरपाई म्हणून ही रक्कम दिली जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला.

याशिवाय प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी १२ हजार कोटी रुपयांहून अधिक निधीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सध्या या योजनेचे १० कोटी ३३ लाख लाभार्थी आहेत आणि त्यांना कमाल ९ सिलिंडरसाठी प्रति सिलिंडर ३०० रुपयांची सबसिडी दिली जाते. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी

४ हजार २०० कोटी रुपये द्यायलाही या बैठकीत मान्यता मिळाली. देशभरातल्या पावणे ३०० संस्थांना यातून मदत दिली जाईल.

आसाम आणि त्रिपुरासाठी सव्वा ४ हजार कोटी रुपयांचं विशेष पॅकेज मंत्रीमंडळानं आज मंजूर केलं.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. पुतिन यांनी प्रधानमंत्री मोदी यांना युक्रेनशी संबंधित ताज्या घडामोडींची माहिती दिली. रशिया आणि यूक्रेन या देशांमधल्या संघर्षावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा निघावा, यासाठी भारताच्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार मोदी यांनी यावेळी केला. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय मुद्द्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि भारत-रशियातली धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या संवादा दरम्यान, मोदी यांनी वर्षाच्या अखेरीला होणाऱ्या २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी पुतिन यांना भारतात आमंत्रित केलं.

<><><><><><>

टोमॅटोच्या किरकोळ दर देशभरात वाढल्याचं सरकारने म्हटलं आहे. स्थानिक कारणांमुळे हे दर वाढले असून उत्पादनातील तूट किंवा मागणी-पुरवठा असमतोल याचा यात काही संबंध नाही असं सरकारने स्पष्ट केलं आहे. देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्लीत टोमॅटोचे दर ७३ रुपये किलो झाल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. पावसामुळेच जुलै महिन्याच्या शेवटी टोमॅटोचे दर ८५ रुपये प्रति किलो झाले होते. गेल्या आठवड्यात आझादपूर मंडईत आवक वाढल्यामुळे हे दर कमी होत आहेत, असंही मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><><>

अत्यावश्यक वापराची ४ औषधं आणि ३७ औषध फॉर्मुलेशनच्या कमाल किंमतीवर मर्यादा आणण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. संसर्ग, हृदयरोग, मधुमेह यावरच्या औषधांचा यात समावेश आहे. ब्रँडेड किंवा जेनरिक औषध विक्रेत्यांनी कमाल किमतीची मर्यादा ओलांडू नये असं राष्ट्रीय औषध मूल्य प्राधिकरणानं म्हटलं आहे. मात्र ज्यांच्या किमती कमाल किमतीपेक्षा कमी आहेत त्यांनी सध्याची किंमत कायम ठेवावी असं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

आज नारळी पौर्णिमा. श्रावण पौर्णिमेला येणारा हा सण विशेषतः किनारपट्टीवरच्या मच्छिमार समाजात उत्साहानं साजरा केला जातो.

पावसाळ्यात उधाण आलेल्या समुद्राला शांत आणि प्रसन्न करण्यासाठी विधीवत नारळ अर्पण करण्यात येत आहे. आतापर्यंत बंदरात बांधून ठेवलेल्या होड्या डागडुजी आणि  रंगरंगोटी करुन पुन्हा समुद्रात हाकारायच्या, यानिमित्त कोळीवाड्यांमधे उत्सवी वातावरण आहे. मुंबईत तसंच किनारपट्टीवरच्या विविध चौपाट्या आणि बंदरावर जत्रा भरल्या आहेत.

<><><><><><>

हिंगोली जिल्ह्यातल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक राख्या तयार केल्या आहेत. धान्यापासून बनवलेल्या या राख्यांविषयी जाणून घेऊया आमचे वार्ताहर रमेश कदम यांच्याकडून

**-- होल्ड - हिंगोली व्हाइस कास्ट--(३१ सेकंद)**

<><><><><><>

बिहारमधे मतदारयाद्यांच्या पुनरिक्षणाबाबत चर्चेची मागणी करत विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ केला. कामकाजात व्यत्यय येत राहिला. लोकसभेत  सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र गदारोळामुळे सभापतींनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर ३ वाजेपर्यंत

कामकाज तहकूब केलं. त्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्राप्तीकर विधेयक २०२५ मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला, तो सभागृहानं मंजूर केला. त्यानंतर खासगी सदस्यांची विधेयकं मांडली जाणार होती. मात्र घोषणा चालूच राहिल्यानं सभापतींनी दिवसभरासाठी कामकाज स्थगित केलं.

राज्यसभेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विविध मुद्द्यांवर विविध पक्षांकडून आलेले २० स्थगन प्रस्ताव फेटाळले. त्याच्या निषेधात सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज त्यांनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित केलं.

भारत छोडो आंदोलनातल्या स्वातंत्र्यसैनिकांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आदरांजली वाहण्यात आली. महात्मा गांधींनी पुकारलेल्या या आंदोलनाला उद्या ८३ वर्ष पूर्ण होत आहेत. लोकसभेत माजी सदस्य दिवंगत सत्यपाल मलिक यांनाही आदरांजली वाहण्यात आली.खतांची तस्करी आणि साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही रसायने आणि खत मंत्री जे पी नड्डा यांनी आज लोकसभेत दिली.

**<><><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताकडून आयातीवर दुप्पट म्हणजे ५० टक्के टेरिफ लागू करणार असल्याचं जाहीर केल्यानंतर आज देशातले शेअर बाजार जवळपास एका टक्क्यानं कोसळले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६६५ अंकानी घसरून ७९ हजार ८५८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत २३३ अंकांची घसरण झाली आणि तो २४ हजार ३६३ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

श्रोते हो, स्वातंत्र्य दिन अवघ्या आठवडाभरावर आला आहे. आतापर्यंतच्या स्वातंत्र्य दिनाच्या तुमच्या काही आठवणी असतील तर त्या अधिकाधिक

लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी आकाशवाणीनं तुम्हाला उपलब्ध करुन दिली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या संदर्भातल्या तुमच्या आठवणी सांगणारा व्हिडीओ रेकॉर्ड करा आणि फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर आमच्या airnews mumbai या अकाऊंटला टॅग करा. अधिकाधिक लोकांपर्यंत तो पोहोचवण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करू.

**<><><><><>**

माहिती, ज्ञान आणि मनोरंजन या उद्दिष्टासाठी प्रसारभारती कार्यरत असून अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत असल्याचं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं वेव्ज् ओटीटी मंचावरच्या नियतकालिक विक्रीचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. या मंचावर मासिक ९९ रुपये तर वार्षिक ९९९ रुपये वर्गणीवर ८ भाषांमधली मिळून ५० नियतकालिकं उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेबरोबर संरक्षण खरेदीशी संबंधित चर्चा थांबवल्याचा दावा करणाऱ्या बातम्यांचे वृत्त संरक्षण मंत्रालयानं आज फेटाळून लावलं. हे वृत्त खोटं आहे, खरेदीच्या विविध प्रकरणांमध्ये सध्याच्या प्रक्रियेनुसार प्रगती होत असल्याचं मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पूर्व नियोजन, कालमर्यादा, पारदर्शकता, गुणवत्ता आणि विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातून राज्यातले पायाभूत सुविधा विकास प्रकल्प झपाट्यानं पूर्ण करावेत असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. पुण्यात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत आयोजित पायाभूत सुविधा विकास प्रकल्प प्रशिक्षणाचं त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

केंद्र सरकारची ११ वर्ष-सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाची या संकल्पनेला धरून देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जात आहे. माहिती प्रसारण मंत्रालयाचा नांदेड इथला केंद्रीय संचार ब्यूरो हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ मंदिर संस्थानाच्या  सहकार्यानं मल्टिमिडीया चित्र प्रदर्शन भरवणार आहे. येत्या सोमवारपासून तीन दिवस हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुलं असणार आहे.

<><><><><><>

नाशिक जिल्ह्यात नांदगाव इथं आज सकाळी मालगाडीचा डबा रुळावरून घसरल्यानं चाळीसगावच्या दिशेनं जाणारी रेल्वे सेवा बंद झाली होती. ती पुन्हा सुरू झाली आहे.

मालगाडी रुळ बदलत असताना डबा घसरल्यामुळे दिल्ली ते मुंबई दरम्यानची राजधानी एक्सप्रेस थांबवण्यात आली होती.

//<><><><><><>//